# महाराष्ट्र शासन

## उद्योग संचालनालय

दुसरा माळा,नवीन प्रशासन भवन,हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालयासमोर,
मुंबई -४०० ०३२.

दू. क्र. ०२२-२२८३ १९०२ ई-मेल: di.cmegp@maharashtra.gov.in

क्र.उसं/मुरोनिका/प्रशिक्षण सूट/२०२१/सी- ८३४५ दिनांक:- 16 JUL 2021

प्रति,

१. महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र (सर्व)

२. जिल्हा खादी व ग्रामोदयोग अधिकारी,
जिल्हा खादी व ग्रामोदयोग मंड्ळ (सर्व)

विषय:- सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात मु.रो.नि.का. योजनेतंर्गत पेट्रोल, डिझेल व ई-व्हेईकल आधारीत वाहनावरील फिरते खाद्यान्न विक्री केंद्र, भाजीपाला व इतर फिरते विक्री केंद्र या व्यवसायातंर्गत लाभार्थ्यांना बँकेद्वारे मंजूर कर्ज प्रकराणातंर्गत EDP प्रशिक्षणाची अट शिथिल करण्याबाबत.

संदर्भ:- १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. सी-५९१०,दि.२९.०४.२०२१
२. या कार्यालयाचे पत्र जा. क्र. उ. सं. जि.उ.के. /मु. रो. नि. का. /२०२२-२२/ सी- ७९५५, दि. ०८.०७.२०२१.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना ही राज्याची महत्वकांक्षी योजना असून सन २०१९-२० पासून बेरोजगार युवक-युवतींना स्वत:चा स्वयंरोजगार सूरू करण्यासाठी व रोजगार निर्मितीसाठी राबविण्यात येत आहे.

संपूर्ण देशात मार्च-२०२० पासुन कोव्हिड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने सन २०१९-२० या मागील आर्थिक वर्षात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत मंजूर असलेले परंतु लाभार्थ्यांच्या उद्योजकीय प्रशिक्षणाअभावी कर्जाचे हप्ते वितरीत करण्यात न आलेल्या कर्ज प्रकरणांतर्गत लाभार्थ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम महामारीमुळे आयोजित करणे शक्य झालेले नाही. त्याअनुषंगाने योजनेअंतर्गत प्रशिक्षणाची अट संदर्भिय परिपत्रक क्र.१ अन्वये दि.३१.०५.२०२१ पर्यत शिथिल करण्यात आलेली होती व तद्नंतर शासन मान्य प्रशिक्षण संस्था एम.सी.ई. डी व मिटकान यांच्या द्वारे संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये लाभार्थ्यांचे प्रशिक्षण सुरु करण्यात आलेले आहे.

तथापि सद्य:स्थितीत पेट्रोल, डिझेल व ई-व्हेईकल आधारीत वाहनावरील फिरते खाद्यान्न विक्री केंद्र, भाजीपाला व इतर फिरते विक्री केंद्र सूरू करण्यासाठी जिल्ह्यांना अर्ज प्राप्त झालेल्या अर्जांची बँकेद्वारे मंजूरी मिळुनही प्रशिक्षणाअभावी कर्ज वितरित होत नसल्याने व कोव्हीड-१९ च्या महामारीमुळे जिल्ह्यातील स्थानिक प्रशासनामार्फत तसेच शासनामार्फत विविध निर्बंधामुळे सदर प्रकरणे प्रलंबित आहे. सदर कर्ज वाटपापूर्वी प्रशिक्षण पूर्ण करण्याची अट शिथिल करणेबाबत लाभार्थ्यां कडुन, क्षेत्रीय कार्यालयाकडुन वांरवार विनंती करण्यात येत आहे.

त्यानुसार सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात योजनेंतर्गत दि. ३१.०७.२०२१ पर्यंत बँकेद्वारे मंजुर करण्यात आलेल्या पेट्रोल, डिझेल व ई-व्हेईकल आधारीत वाहनावरील फिरते खाद्यान्न विक्री केंद्र, भाजीपाला व इतर फिरते विक्री केंद्र सूरू करण्यासाठी प्रशिक्षण पूर्ण करण्याची अट खालील अटी व शर्तीस अधीन राहून शिथिल करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

१. पेट्रोल, डिझेल व ई-व्हेईकल आधारीत वाहनावरील फिरते खाद्यान्न विक्री केंद्र, भाजीपाला व इतर फिरते विक्री केंद्र व्यवसायाकरिता अर्ज केलेल्या अर्जदारांनी संबधीत जिल्ह्याचे महाव्यवस्थापक यांना सदर लाभार्थ्यांना उद्योजकीय विकास प्रशिक्षण कर्ज वाटप झाल्यापासून पुढिल ३ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करेल अशी हमी संबधित लाभार्थ्याकडून हमी पत्राद्वारे घ्यावी.

२. वरील अर्जदारांचे प्रशिक्षण कार्यक्रम विहीत मुदतीत (कर्ज वाटपानंतर पुढील ३ महिन्यात) पूर्ण करून घेण्याची जबाबदारी संबधित महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांची राहिल व तदनंतरच सदर प्रकरणांतर्गत अनुज्ञेय मार्जिन मनीचे दावे मुख्यालयास पुढील वितरणाकरिता सादर करतील.

३. वरील प्रशिक्षण शिथिलते बाबतची अट केवळ पेट्रोल, डिझेल व ई-व्हेईकलवर आधारीत वाहनावरील फिरते खाद्यान्न विक्री केंद्र व इतर फिरते विक्री केंद्र सूरू करण्यासाठीच लागू राहील.

४. योजने अंतर्गत इतर पात्र व बँकेद्वारे मंजूर कर्ज प्रकरणांतर्गत, लाभार्थ्यांनी विहित प्रशिक्षणाची अट पूर्ण केल्यानंतरच संबधित बँकानी कर्ज वाटप करून मार्जिन मनीचे दावे अंमलबजावणी यंत्रणांना सादर करावेत.

**विकास आयुक्त (उद्योग)**
**यांच्या मान्यतेने**

(बी. एस. जोशी.)
अति.उद्योग संचालक

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीस्तव:-**

१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव.
२) उद्योग सह संचालक,विभागीय कार्यालये (सर्व)
३) अधिक्षकीय उद्योग अधिकारीं,उपविभागीय कार्यालय, नांदेड

Scanned with CamScanner